Subject Code **J-271**

Seat No. | | | | | | | |

**M**

DATE : 23/06/2026

Time : 11.00 - 2.00

# SUBJECT : HISTORY (38)

DURATION : 3 Hours　　TOTAL PAGES : 8　　TOTAL MARKS : 80

**सूचना :** (i) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(ii) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.

(iii) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेनानेच काढाव्यात.

(iv) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर सुरू करावे.

**प्र. १. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा :** (६) **१०**

(i) आफ्रिका खंडाला वळसा घालणारा -------- हा पहिला दर्यावर्दी होता.

(अ) हेन्री द नॅव्हीगेटर　　(ब) मार्को पोलो

(क) बार्थोलोम्यु डायस　　(ड) कोलंबस

(ii) इंग्लंडच्या ------ ने कंपनीला पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्याचा परवाना दिला.

(अ) सर जॉर्ज ऑक्झिंडेन　　(ब) राणी एलिझाबेथ पहिली

(क) राजकन्या ब्रॅगंझा　　(ड) दुसरा चार्ल्स

(iii) छत्रपती शिवाजी महाराज आणि इंग्रज यांचा संबंध सर्वप्रथम ------- प्रकरणात आला.

(अ) कुडाळ स्वारी　　(ब) अफजल खान

(क) सिद्दी जोहर　　(ड) राज्याभिषेक

(iv) हैदराबाद संस्थानाच्या मुक्तिलढ्याचे नेतृत्व ------- यांनी समर्थपणे केले.

(अ) राजा हरिसिंग　　(ब) स्वामी रामानंद तीर्थ

(क) पंडित महादेवशास्त्री जोशी　　(ड) केशवराव जेधे

(v) एच.एस. विल्यम यांनी ------- ऐक्याचा विचार मांडला.

(अ) आशियाई (ब) ऑस्ट्रेलियन

(क) अमेरिकन (ड) आफ्रिकी

(vi) १९४७च्या जिनिव्हा परिषदेत जो करार झाला तो ------- करार म्हणून ओळखला जातो.

(अ) सिएटो (ब) नाटो

(क) गॅट (ड) सार्क

**(ब) पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा :** (४)

(i)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) पहिले ब्रह्मीयुद्ध | — | लॉर्ड ॲम्हर्स्ट |
| (ब) दुसरे ब्रह्मीयुद्ध | — | लॉर्ड डलहौसी |
| (क) तिसरे ब्रह्मीयुद्ध | — | लॉर्ड डफरीन |
| (ड) अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहिरनामा | — | जॉर्ज वॉशिंग्टन |

(ii)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) फिरंग | — | पोर्तुगीज ब्लेडने बनलेली भारतीय तलवार |
| (ब) फिरंगी | — | पोर्तुगीज आणि कालांतराने सर्व युरोपियन |
| (क) बारदेश | — | गोव्याच्या उत्तरेकडील प्रदेश |
| (ड) चौथाई | — | करदात्याच्या एकूण उत्पन्नाचा $\frac{१}{१०}$ भाग |

(iii)

| 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|
| (अ) बांडुंग | — | बर्लिन परिषद |
| (ब) पॅरिस | — | १९१९ मधील पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| (क) लंडन | — | १९०० मधील पहिली अखिल आफ्रिका ऐक्य परिषद |
| (ड) मँचेस्टर | — | आफ्रिकी ऐक्य परिषद |

(iv) 'अ' गट — 'ब' गट

(अ) राहीबाई पोपेरे — कळसुबाई परिसर बियाणे संवर्धन समिती

(ब) भाऊ काटदरे — रायगड निसर्ग मित्र संस्था

(क) प्रेमसागर मेस्त्री — सी-स्कॅप संस्था

(ड) हमीद दलवाई — मुस्लिम सत्याशोधक समाज

---

**प्र. २. (अ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना या संबंधीची नावे लिहा :** (४) ८

(i) वराहमिहीर यांनी लिहिलेला ग्रंथ –

(ii) इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स यांच्या होणाऱ्या पत्नीचे नाव –

(iii) पहिल्या महायुद्धातील इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इटली, आणि अमेरिका या राष्ट्रांचा गट –

(iv) कॉमनवेल्थ गेम्सची संकल्पना यांनी मांडली –

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा :** (४)

(i) म्यानमारवर कब्जा मिळवणे हे ब्रिटिशांचे उद्दिष्ट्य होते. कारण –

(अ) ब्रिटिशांना साम्राज्य विस्तार करायचा होता.

(ब) म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्काची बाजारपेठ यावर ताबा मिळविणे ब्रिटिशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

(क) ब्रिटिशांना युरोपीय वसाहतवादी स्पर्धेत पुढे राहायचे होते.

(ड) म्यानमारचा राजा थिबा याला त्यांना धडा शिकवायचा होता.

(ii) राजा हरिसिंग यांनी काश्मीरच्या संरक्षणासाठी भारताकडे मदत मागितली. कारण –

(अ) काश्मीरच्या पाकिस्तानी सीमेवरील सशस्त्र टोळ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी.

(ब) काश्मीरचे नैसर्गिक सौंदर्य टिकविण्यासाठी.

(क) काश्मीरचे युरोपीय टोळ्यांपासून संरक्षण करण्यासाठी.

(ड) काश्मीरच्या युरोपीय पर्यटकांना काश्मीरमध्ये संरक्षण देण्यासाठी.

(iii) दुसऱ्या महायुद्धानंतर 'संयुक्त राष्ट्रे' या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना झाली. कारण

(अ) पराभूत राष्ट्रांना दबावाखाली ठेवण्यासाठी.

(ब) साम्राज्य विस्तार करण्यासाठी.

(क) जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी.

(ड) निरक्षरता दूर करण्यासाठी.

(iv) भारताने जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व स्वीकारले. कारण –

(अ) भारताला इतर देशांशी व्यापारी स्पर्धा करावयाची होती.

(ब) भारत जागतिक अर्थव्यवस्थेपासून लांब राहू शकत नव्हता.

(क) भारताला मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारावयाची होती.

(ड) भारताला जागतिक पातळीवर नेतृत्व करावयाचे होते.

---

**प्र. ३. (अ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :** (५) १३



(i) वरील नकाशा कोणत्या विषयाशी संबंधित आहे?

(ii) वर्तमान महाराष्ट्रात असलेले उठाव झालेले एक ठिकाण लिहा.

(iii) वर्तमान पाकिस्तानमधील एका उठावाचे ठिकाण लिहा.

(iv) भारताच्या दक्षिणेकडील शेजारी राष्ट्र कोणते?

(v) अरबी समुद्रातील भारतीय बेटाचे नाव लिहा.

**(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा ( कोणतेही चार ) :** (८)

(i) संकल्पना चित्र पूर्ण करा




(ii) संकल्पना चित्र पूर्ण करा :



(iii) संकल्पना चित्र पूर्ण करा :

दादरा व नगर हवेली मुक्तिसाठी कार्य केलेल्या व्यक्ती

- ..............
- ..............
- ..............
- ..............

(iv) संकल्पना चित्र पूर्ण करा :

अलिप्ततावाद (नाम) संघटना स्थापनेतील देश

- ................
- ................
- ................
- ................
- युगोस्लाव्हिया

(v) संकल्पना चित्र पूर्ण करा :

सुवर्ण चतुष्कोन योजनेद्वारे जोडली गेलेली शहरे

- ..........
- ..........
- ..........
- ..........

(vi) संकल्पना चित्र पूर्ण करा :

या संघटनांच्या संयुक्त विद्यमाने पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात आली

- ..................
- ..................
- ..................
- ..................

**प्र. ४. (अ) टिपा लिहा ( कोणत्याही तीन ) :** (६) **१५**

(i) कार्ताझ

(ii) वायकोम सत्याग्रह

(iii) अनुशीलन समिती

(iv) शीतयुद्ध

(v) आयुष (AYUSH)

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा ( कोणतीही तीन ) :** (९)

(i) अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात 'बोस्टन-टी-पार्टी' ही घटना घडली.

(ii) इंग्रज-फ्रेंच यांच्यात 'कर्नाटक युद्धे' झाली.

(iii) दुसरे महायुद्ध घडून आले.

(iv) १९४८मध्ये ब्रिटिशांनी म्यानमारला स्वातंत्र्य दिले.

(v) 'स्पीड-पोस्ट' सेवा विश्वसनीय आणि गतिमान झाली आहे.

---

**प्र. ५. तुमचे मत नोंदवा ( कोणतेही तीन ) :** **९**

(i) युरोपात १७व्या शतकात निसर्गाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांनीच आधुनिक ज्ञानाचा पाया घातला.

(ii) पोर्तुगीजांनी भारतात वसाहती स्थापन केल्या.

(iii) महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे धोरण पुरोगामी समजले जाते.

(iv) आफ्रिका खंडाच्या निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.

(v) पर्यटन क्षेत्र हे दिवसेंदिवस प्रगत होत आहे.

---

**प्र. ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा ( कोणतेही दोन ) :** **१०**

(i) वसाहतवादाच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.

(ii) गोवा मुक्तिलढ्याविषयी माहिती लिहा.

(iii) सार्क (SAARC) संघटनेविषयी माहिती लिहा.

---

**प्र. ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **१५**

(i) भौगोलिक शोध व शोधक यांच्याविषयी माहिती लिहा –

(अ) इब्न बतूता

(ब) कॅप्टन जेम्स कुक

(क) बार्थोलोम्यु डायस

(ii) पोर्तुगीज व मराठे यांचे संबंध स्पष्ट करा –

(अ) छत्रपती शिवाजी महाराज

(ब) छत्रपती संभाजी महाराज

(क) छत्रपती शाहू महाराज

(iii) भारतीय राष्ट्रीय सभेची (काँग्रेस) माहिती लिहा –

(अ) पार्श्वभूमी

(ब) स्थापना

(क) मवाळ जहाल विचारसरणी

(iv) जागतिक महायुद्धांचे भारतावरील परिणाम स्पष्ट करा

(अ) पहिले महायुद्ध

(ब) दुसरे महायुद्ध

(v) भारताचे संरक्षण विषयक धोरण स्पष्ट करा –

(अ) कारगील युद्ध

(ब) मेक-इन-इंडिया

(क) नोकरीची संधी

◆◆◆